# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**


एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./१०९९ /२०२० दि.०९ /०३/२०२०

## परिपत्रक

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक व सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, ‘‘सीआयआय, एनआरसीच्या विरोधातील वाढत्या आंदोलनाची दखल घेत कठोर कार्यवाही करा’’ अशी बातमी ‘‘दैनिक लोकमत’’ या वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने माहिती व जनसपर्क महासंचालनालयाने खुलासा मागितलेला आहे.

तरी याबाबत आपल्या महाविद्यालयाचा खुलासा बातमीच्या अनुषंगाने माहिती घेऊन तात्काळ या कार्यालयात सादर करावा.

**(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र:- वृत्तपत्राची प्रत.


**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. सहाय्यक कुलसचिव, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

लोकमत (http://epaperlokmat.in/)

()

लोकमत



# सीएए, एनआरसीच्या विरोधातील वाढत्या आंदोलनांची दखल घेत कठोर कारवाई करा

केंद्राची राज्य सरकारला सूचना; विद्यार्थ्यांना विरोध करण्यापासून रोखावे

## विद्यापीठावर विशेष नजर

सुधारित नागरिकत्व कायद्याला विरोध

# हा देश, ही माती आमची; हुकूमशहा मोदी सरकारचा अंत हिटलरसारखा

## आवाज उठवणे हे कर्तव्य - वर्षा विद्या विलास

## अल्पसंख्याकासह विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग

## नागरिकांच्या हक्काला बाधा पोहोचू नये - फरहान अख्तर

## 'तुम्हारी लाठी से तेज हमारी आवाज है'

## हिंदुस्थान कोणाच्या बापाचा नाही - जावेद जाफरी

## सर्व एकत्र ही उत्तम गोष्ट - सुशांत सिंह

## देशाची फाळणी होऊ देणार नाही - स्वरा भास्कर

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.
25 FEB 2020
आवक क्रमांक:-
शाखा:-

क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.०१/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक - १८ फेब्रुवारी, २०२०.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

**विषय :-** "सीआयआय, एनआरसीच्या विरोधातील वाढत्या आंदोलनांची दखल घेत कठोर कारवाई करा" या बातमीचा खुलासा.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांनी सचिव (उ. व तं. शि.) यांना पाठविलेल्या दि. २०.१२.२०१९ च्या पत्रांची प्रत सहपत्रासह सोबत जोडली आहे.

सदर पत्रासोबतच्या "लोकमत" या वृत्तपत्रातील कात्रणातील बातमीच्या अनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने खुलासा मागविला आहे. तरी या संदर्भात तात्काळ खुलासा करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(प्रविणकुमार पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र:- वरीलप्रमाणे

प्रत:-

संचालक, उच्च शिक्षण, पुणे.

**महाराष्ट्र शासन : वृत्तपत्र कात्रणे**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२

वृत्तपत्राचे नाव : **लोकमत**

दिनांक 20 DEC 2019

सचिव
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र.............
दि.............

# सीआयआय, एनआरसीच्या विरोधातील वाढत्या आंदोलनांची दखल घेत कठोर कारवाई करा

## केंद्राची राज्य सरकारला सूचना; विद्यार्थ्यांना विरोध करण्यापासून रोखावे

जमीर काझी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : नागरिकत्व सुधारणा कायदा (सीआयआय) व राष्ट्रीय नागरिक नोंदणीच्या (एनआरसी) विरोधात देशभर होत असलेल्या वाढत्या आंदोलनाला प्रतिबंध घालण्यासाठी कडक कारवाई करण्यात यावी, आंदोलकांना कायद्याचा धाक बसावा, अशी भूमिका पोलिसांनी घ्यावी, अशा स्पष्ट सूचना केंद्रीय गृह विभागाकडून राज्य सरकारना देण्यात आल्या आहेत.

सीआयआय, एनआरसीच्या विरोधात विरोधी राजकीय पक्षापेक्षा महाविद्यालयीन स्तरावरून विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या विरोधाचे गंभीर स्वरूप आहे. त्यामुळे विद्यार्थी संघटनांना या आंदोलनापासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, अशी सूचना करण्यात आली असल्याचे उच्चस्तरीय सूत्रांकडून सांगण्यात आले. त्यासाठी विद्यापीठ, महाविद्यालयाच्या प्रशासनाला खबरदारी घेण्यास सांगितले जात आहे. महाराष्ट्रात महानगरासह ग्रामीण शहरांमध्येही आंदोलनाचे लोण वाढत चालले आहे. त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर ताण वाढला असल्याचे या अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले.

प्रत्येक राज्याच्या पोलीसप्रमुखांना त्यासाठी सूचना केल्या जात आहेत, त्यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांना या आंदोलनापासून परावृत्त करण्याकडे भर देण्याची सूचना करण्यात आलेली आहे. विद्यापीठ, महाविद्यालयांना योग्य खबरदारी घेण्याचे कळविले जाणार आहे. विद्यार्थ्यांचे लक्ष शैक्षणिक अभ्यासक्रमावर केंद्रित करण्यावर भर द्यावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्याची सूचना करण्यात आली आहे.

कायद्याविरुद्ध आंदोलन करणाऱ्या घटकांवर कठोर कारवाई करावी, कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होऊ नये, यासाठी योग्य खबरदारी घ्यावी, विद्यार्थ्यांच्या आडून कोणी समाजकंटक विरोध करीत असल्यास त्यांना तत्काळ अटक करून त्यांचे पितळ उघडे पाडावे, असे सांगण्यात आले आहे.

### सूचनांचे पालन

आंदोलकांना शांततेने विरोध प्रकट करण्यासाठी सहकार्य करण्याच्या सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पोलीस महासंचालकांना केल्या आहेत. त्यामुळे राज्यात शहर व ग्रामीण भागात मोठे मोर्चे निघत असूनही एकही हिंसक घटना घडलेली नाही. मात्र केंद्राकडून आंदोलकांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले गेल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये काहीशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

राज्य सरकारचे थेट नियंत्रण असल्याने त्यांच्याकडून आलेल्या सूचना प्राधान्याने पाळल्या जात असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

### महाविद्यालये, विद्यापीठावर विशेष नजर

नागरिकत्व सुधारणा कायद्याला विरोध करणाऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे, त्यामुळे महाविद्यालये, विद्यापीठ परिसरात विशेष लक्ष केंद्रित करून आंदोलन टाळण्याची दक्षता घेण्याची सूचना संबंधित हद्दीतील प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी संघटनांच्या हालचालींवर नजर ठेवली जात आहे.